MHGO060002972022

**निशाणी क्र.४२ खालील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज हा वादीने दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ६ मधील नियम १७ प्रमाणे दाखल केला.

२) वादीच्या वकीलांनी असे कथन केले आहे की, वादीने प्रतिवादीं विरुध्द कायम ताकीद मिळण्याकरीता दावा दाखल केला आहे. सदर दावा दाखल केल्यानंतर प्रतिवादी क्र. ३ याने या दाव्यामध्ये प्रवेश करुन स्वतःला प्रतिवादी म्हणून जोडले आहे आणि स्वतःचे लेखी बयाण सुध्दा दाखल केले आहे. अशा परिस्थितीमध्ये वादीला दाव्यामध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे. म्हणून वादीने दाव्याचे परिच्छेद क्र. ४ च्या नंतर परिच्छेद क्र. ४ अ जोडण्याची परवानगी मागितली आहे.

३) प्रतिवादी क्र. १ व २ च्या वकीलांनी आक्षेप घेतला व सदर अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे. तसेच प्रतिवादी क्र. ३ चे वकीलांनी असे कथन केले आहे की, वादीने प्रतिवादी क्र. ३ ला जाणुनबुजून दावा दाखल करतांनी जोडले नाही व सत्य परिस्थिती लपवून ठेवून स्टेटकोचा आदेश मिळवून पंचायत विभागाच्या पुढील कार्यवाहीला थांबविले. म्हणून त्याला दुरुस्ती करण्यास परवानगी देण्याचा कोणताही प्रश्न उद्भवत नाही.

४) अर्जाचे अवलोकन केले. वादीने सदरचा दावा कायम ताकीद मिळण्याकरीता

दावा दाखल केला आहे. वादीच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी क्र. ३ यांनी स्वतःला दाव्यामध्ये प्रतिवादी म्हणून जोडून घेतले आहे व स्वतःचे लेखी बयाण देखील दाखल केले आहे. म्हणून वादीला अशा परिस्थितीत दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. ३ बाबत दुरुस्ती करणे आवश्यक आहे. प्रस्तुतचा अर्ज मंजुर केल्यास उभयपक्षातील वादीचे कायमस्वरूपी निराकरण करणे सोईचे होईल तसेच दाव्याचे स्वरुपात कोणतेही बदल होणार नाही. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ मधील तरतुदीच्या अनुषंगाने व न्यायाच्या दृष्टीने सदरहु दुरुस्ती करणे उचीत ठरेल. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येते,

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १ | निशाणी क्र.४२ वरील अर्ज मंजुर करण्यात येत आहे. |
| २ | वादीने प्रस्तावीत दुरूस्ती १४ दिवसांच्या आत करावी. |

स्वा/–

(**एन. व्ही. साहु**)

दिनांक २२/०९/२०२३

दिवाणी न्यायाधीश (क. स्तर),

अर्जुनी/मोरगांव